नियमित दिवाणी दावा नं. २२५/२०१६
रमा हटकर वि. गुंफाबाई मस्के
**निशाणी क्र.४४ खाली**
C.N.R No. MHWS020007122016

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास अधिवक्ता श्री. के. आर. दागडीया यांचे तर्फे शपथेवर सुरु</u>.**

मी, सदर प्रकरणात माझा शपथेवरील पुरावा दाखल केला असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे, ती मी ओळखतो.

मी दावा दाखल करण्यापूर्वी सरकार पक्षास कलम ८० ची नोटीस दिली होती. त्या नोटीसची प्रत निशाणी क्रमांक ४ लगत अनुक्रमांक १ ला दाखल केलेली आहे, त्यावर माझ्या वकिलांची सही आहे व ती मी ओळखतो. त्यातील मजकुर खरा असून बरोबर आहे, त्यास **<u>निशाणी क्रमांक ४५</u>** देण्यात आला. सदर नोटीस मी रजीष्टर पोस्टाने पाठविल्याबाबत पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यास **<u>निशाणी क्रमांक ४६</u>** देण्यात आला. सदरच्या नोटीस ह्या मायनर इरिगेशन, लघु पाटबंधारे विभाग, सब डिव्हीजनल ऑफीसर आणि कलेक्टर महाराष्ट्रा यांना मिळालेल्या आहेत, त्याच्या पोहचपावत्या मी या कामी निशाणी क्रमांक ४२ लगत अनुक्रमांक ३, ४ व ५ लगत दाखल केलेल्या आहेत त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्रमांक ४७ ते ४९</u>** देण्यात येत आहे.

मी निशाणी क्रमांक ४२ लगत अनुक्रमांक १ ला मुळ खरेदी खत दाखल केलेले आहे, त्याचे एक पान हरवलेले आहे म्हणून मी सब रजीष्टर ऑफीसमधून त्याची प्रमाणित प्रत घेवून या कामी निशाणी क्रमांक ४३ लगत अनुक्रमांक १ ला दाखल केलेली आहे. मुळ खरेदी खत आणि प्रमाणित प्रतीचा खरेदी खतामधील मजकुर खरा असुन बरोबर आहे. सदरचे खरेदी खत माझे वडिल महादा हुसेन हटकर यांनी आनंदा दगडू मारकड आणि धोंडबा शामराव मारकड यांच्याकडून दिनांक ०८/०३/१९८९ रोजी रक्कम रूपये तेरा हजार पाचशे करीता खेरदी करून घेतले. त्यावर माझे वडिल महादा हुसेन हटकर यांचा अंगठा आहे. माझे वडिल सन २०१४ मध्ये मरण पावले. सदरचा खरेदी दस्त हा तीन वर्षे जुना असल्याकारणाणे भारतीय पुरावा कायदा कलम ९० प्रमाणे त्याच्या एक्झीक्युशनला प्रिझम्शन ग्राह्य धरून त्यास निशाणी देण्यात येत आहे. सबब मुळ खरेदी खतास

**<u>निशाणी क्रमांक ५०</u>** आणि खरेदी खताची प्रमाणित प्रत यास **<u>निशाणी क्रमांक ५१</u>** देण्यात येत आहे.

उपविभागीय अधिकारी, वाशिम यांच्याकडे माझा भाऊ राम महादेव हटकर यांनी दिनांक २२/०८/२०१६ रोजी जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी हरकत अर्ज दाखल केला होता.

मी निशाणी क्रमांक ४२ लगत अनुक्रमांक ७ व ८ ला मी दावा जमीन सर्वे नंबर २४ चे पोटहिस्से क्रमांक २, ४ आणि ५ च्या नकाशाच्या प्रमाणित प्रती दाखल केलेल्या आहेत. त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्रमांक ५२ ते ५४</u>** देण्यात येत आहे.

**<u>सरतपास पुर्ण</u>.**

**<u>प्रतिवादी व त्यांचे वकिलांना पुकारले असता गैरहजर. मुदतीसाठी कोणताही अर्ज नाही. सबब साक्षीदाराचा प्रतिवादी क्र.२, ४, ६ आणि १२ तर्फे उलटतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by NAYOMI PRAKASH PAWAR
Date: 2022.11.29 14:48:44 +0530

(नयोमी. पी. पवार)

दिनांक २९/११/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file are same word to word, as per the original Evidence.

| | |
|---|---|
| Court Name | : Jt. Civil Judge (S.D.), Washim, Dist.Washim. |
| Date | : 29.11.2022. |
| Evidence signed by the presiding officer on | : 29.11.2022. |
| Evidence uploaded on | : 29.11.2022. |
| Evidence uploaded by | : S. P. Kale (Stenographer G-III ) |